2 0 AUG 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कठोर परिश्रमासह ध्येयवेडे व्हा

## डॉ. तुषार जाधव : विद्यापीठात सेवा पूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेतले पाहिजेच. त्याचबरोबर, ध्येयवेडेही झाले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासन जळगाव येथील सहायक गट विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे २०१७-१८ कालावधीच्या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. जाधव बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कार्यक्रम झाला. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. जाधव म्हणाले, स्पर्धा परीक्षांबद्दल मनामध्ये असलेली भीती प्रथमतः विद्यार्थ्यांनी काढून टाकावी. स्वतःचा आत्मविश्वास वाढवावा, कोणताही न्यूनगंड बाळगू नये. सखोल वाचन आणि त्यावरील मुद्दे यांची टिपण ठेवावी. अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नपत्रिकांचा सातत्याने अभ्यास करावा. दिवसातून कमीत कमी सहा तास अभ्यास करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कमतरता ओळखून पुढे गेले पाहिजे. प्रामाणिकपणा, कणखरवृत्ती, हजरजबाबीवृत्ती जोपासणे आवश्यक आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. तुषार जाधव.

स्पर्धा परीक्षांचे अर्ज काळजीपूर्वक भरावेत. त्यावर आधारित प्रश्न विचारले जाऊ शकतात. विद्यार्थ्यांनी सखोल वाचन, चिंतन, मनन यामध्ये सातत्य ठेवावे. विविध वर्तमानपत्रांमधील लेख वाचावेत. समाजकार्य करण्याची प्रचंड इच्छाशक्ती बाळगून तळागाळातील लोकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्याची तळमळ असली पाहिजे. एमपीएससीच्या दोन वर्षांचा प्रशिक्षण कालावधी आता यूपीएससीच्या धर्तीवर सुरू करणारे महाराष्ट्र राज्य हे एकमेव आहे. डॉ. जाधव यांनी पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत तंत्र याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षीय भाषणात म्हणाले, डॉ.जाधव यांचे संपूर्ण कुटुंबीय समाजास प्रेरणा देणारे आहेत. समाजामध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत स्पर्धा आहे. एमपीएससी आणि यूपीएससी या स्पर्धा परीक्षांमधील राजमार्ग आहेत.

यावेळी डॉ. तुषार जाधव यांच्या भगिनी दीप्ती जाधव, तृप्ती जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व परिचय केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2017

पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने शिव पावन ट्रेकिंग शिबिर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने पन्हाळा-पावनखिंड असा शिव पावन ट्रेकिंग शिबिर उपक्रमास शनिवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीस मान्यता देण्यात आली. यासह शासनाच्या योजना, विविध उपक्रम राबविणे यासह प्रचार-प्रसिद्धी करण्यासाठी विद्यापीठ व जिल्हा प्रशासन यांच्यात सामंजस्य करार करण्यास मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

शिवाजी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाच्या निर्णयानुसार वैयक्तिक अपघात विमा योजना लागू करण्याच्या प्रस्तावालाही आज व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिकल अँड सिव्हिल इनक्युबेशन सेंटर सुरू करण्याचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला. बैठकीस सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 AUG 2017
तरूण भारत

# कर्मचाऱ्यांच्या 'विमा योजने'स मान्यता

**कोल्हापूर** : वित्त विभाग, महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार 'वैयक्तिक अपघात विमा योजना' विद्यापीठ आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात आली. हा निर्णय कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी विद्यापीठात झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेतला. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी राजारामनगर, (साखराळे) या महाविद्यालयामध्ये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 0 AUG 2017

लोकमत

# वैयक्तिक अपघात विमा योजनास मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वैयक्तिक अपघात विमा योजना विद्यापीठ आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांना लागू करण्यास शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन बैठकीत मान्यता दिली. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

साखराळे येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रोमॅकेनिकल अँण्ड सिव्हिल इनक्युबेशन सेंटर सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे पन्हाळा ते पावनखिंड शिव पावन ट्रेकिंग शिबिर आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली.

2 0 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विजया रहाटकर : राज्य महिला आयोगाची विभागीय कार्यशाळा

# स्त्री, पुरुषांमध्ये समानतेचे तत्त्व रुजावे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व स्वीकारले असले तरी प्रत्यक्षात समाजात मोठा विरोधाभास दिसतो. 'कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३' हा कायदा केला आहे. या कायद्याबद्दल अधिकाधिक जनजागृती करून, कामाच्या ठिकाणी महिलांसाठी भयमुक्त व उत्तम वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. तथापि, हा कायदा पुरुषांच्या विरोधात नसून तो पुरुषांच्या गैरवतर्णुकीविरोधात आहे, हे समजून घेतले पाहिजे, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांनी केले.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शनिवारी झालेल्या राज्य महिला आयोगाच्या पाचव्या विभागीय कार्यशाळेत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष डॉ. विजया रहाटकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, ॲड. आशा लांडगे, कुणाल खेमनार, अविनाश सुभेदार, संजय चव्हाण, सचिव डॉ. मंजूषा गोळवणे, पी. व्ही. शिर्के, प्रा. स्मिता अवचाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्य महिला आयोगाची औरंगाबाद, नागपूर, नाशिक, अमरावती या विभागांनंतर कोल्हापूर येथे पाचवी विभागीय कार्यशाळा आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शनिवारी घेण्यात आली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमनार, आयोगाच्या सदस्या ॲड. आशा लांडगे, सचिव डॉ. मंजूषा गोळवणे, सांगली जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय चव्हाण, महिला व बालविकास उपायुक्त पी. व्ही. शिर्के, औरंगाबाद येथील प्रा. स्मिता अवचाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. रहाटकर म्हणाल्या, स्त्री-पुरुष या दोघांच्याही मनात समानतेचे तत्त्व रुजले पाहिजे. एकमेकांना सन्मान दिला पाहिजे. त्या दृष्टीने हा कायदा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा कायदा महिलांना संरक्षणही देतो आणि अन्याय झाल्यास न्यायही देतो; पण त्याबाबत अनेक ठिकाणी अनास्था दिसते.

या कायद्यांतर्गत असलेल्या तक्रार निवारण समितीला कायद्याने सिव्हिल कोर्टाचे अधिकार दिले आहेत. समितीचा निर्णय बंधनकारक केला आहे; पण या समित्यांनी योग्य व संतुलित निर्णय घ्यावा यासाठी या कायद्याबाबत फार मोठ्या प्रमाणावर जनजागृतीची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्य महिला आयोगाच्या वतीने 'पुश' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी म्हणाले, महिला संरक्षणाचे केवळ कायदे करून चालणार नाहीत, तर त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. लैंगिक छळाच्या घटनाच होऊ नयेत, असे वातावरण निर्माण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, कायद्याने महिलांना ३० टक्के आरक्षण दिले आहे. कित्येक ठिकाणी महिलांची संख्या ५० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे; त्यामुळे या कायद्याबद्दल व्यापक जाणीवजागृतीची आवश्यकता आहे. केवळ कामाच्या ठिकाणीच नव्हे, तर समाजात अन्यत्र कोठेही होणारे महिलांवरील अत्याचार उद्विग्न करणारे आहेत.

डॉ. कुणाल खेमनार म्हणाले, हा कायदा अत्यंत संवेदनशील तितकाच सक्षम आहे. लिंगभेदावर आधारित कोणताही भेदभाव केला जाऊ नये. या राज्यघटनेच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करणारा हा कायदा आहे.

यावेळी महिला आयोगाच्या सदस्या आशा लांडगे, प्रा. स्मिता अवचाल यांनीही मनोगत व्यक्त केले. उपायुक्त पी. व्ही. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. महिला व बालविकास अधिकारी नितीन म्हस्के यांनी आभार मानले. यावेळी कोल्हापूर, सोलापूर, सांगली व सातारा या चार जिल्ह्यांतील शासकीय कार्यालयांचे प्रमुख, समिती सदस्य यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

2 0 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्री-पुरुष समानतेबाबत विरोधाभास

## डॉ. विजया रहाटकर : विद्यापीठात राज्य महिला आयोगाची कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा



डॉ. रहाटकर

कोल्हापूर, ता. १९ : भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व स्वीकारले असले तरी प्रत्यक्षात समाजात विरोधाभास दिसतो, असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांनी आज येथे व्यक्त केले.

### डॉ. विजया रहाटकर म्हणाल्या,

- राज्य महिला आयोगाच्या वतीने पुश उपक्रम
- उपक्रमांतर्गत ४० हजार लोकांना कायद्याचे प्रशिक्षण
- दोन लाख लोकांना प्रशिक्षण देणार

शिवाजी विद्यापीठात आयोजित राज्य महिला आयोगाच्या पाचव्या विभागीय कार्यशाळेत त्या बोलत होत्या. पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी अध्यक्षस्थानी होते. लोककला केंद्रात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. रहाटकर म्हणाल्या, "कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची ठरते. हा कायदा महिलांना संरक्षणही देतो आणि अन्याय झाल्यास न्यायही देतो. हा कायदा पुरुषांच्या विरोधात नसून, तो गैरवर्तणुकीच्या विरोधात आहे, हे समजून घेतले पाहिजे."

त्या म्हणाल्या, "स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही मनात समानतेचे तत्त्व रुजले पाहिजे. एकमेकांना सन्मान दिला पाहिजे. त्या दृष्टीने हा कायदा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मात्र, या कायद्याबाबत अनेक ठिकाणी अनास्था दिसते. या कायद्यांतर्गत असलेल्या तक्रार निवारण समितीला कायद्याने सिव्हिल कोर्टाचे अधिकार दिले आहेत.

पान २ वर »

2 0 AUG 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लैंगिक छळ संरक्षण कायदा प्रभावी राबवा

## राज्य महिला आयोग अध्यक्षा डॉ. रहाटकर यांचे विभागीय कार्यशाळेत आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी महिलांचे होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण कायदा हा पुरुषांच्या विरोधात नाही तर तो गैरवर्तणुकीच्या विरोधात आहे. महिलांवर अत्याचार होतो, त्यावेळी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा असे सांगत या कायद्यांतर्गत स्थापन केलेल्या तक्रार निवारण समितीला 'सिव्हिलकोर्टा'चे अधिकार दिले आहेत. यामुळे या समितीचा निर्णय बंधनकारक असल्यामुळे निर्णय संतुलित आणि योग्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी या कायद्याची समग्र माहिती आवश्यक असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांनी शनिवारी सांगितले.

राज्य महिला आयोगाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात विभागीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी होते. भारतीय राज्य घटनेने स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व स्वीकारले असले तरी प्रत्यक्षात समाजात विरोधाभास दिसतो



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आयोजित विभागीय कार्यशाळेत बोलताना अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर. यावेळी उपस्थित विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, कुणाल खेमनार, आशा लांडगे, प्रा. स्मिता अवचाल आदी.**

असे सांगून डॉ. रहाटकर म्हणाल्या, कामाच्या ठिकाणी महिलांचे होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ हा कायदा करण्यात आला आहे. हा कायदा महिलांना संरक्षणही देतो आणि अन्याय झाल्यास न्यायही देतो. या कायद्याबाबत अनेक ठिकाणी अनास्था दिसते. या कायद्याबाबत फार मोठ्या प्रमाणावर जनजागृतीची आवश्यकता आहे.

विभागीय आयुक्त दळवी म्हणाले, केवळ कायदे करून चालणार नाही त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. लैंगिक छळाच्या घटनाच होऊ नयेत असे वातावरण निमाण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. तक्रार आल्यास न्यायही मिळाला पाहिजे. महिला लोकशाही दिनाच्या कार्यक्रमांनंतर त्याच दिवशी तक्रार निवारण समित्यांची बैठक घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत आढावा घ्यावा.

जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, मोठ्या प्रमाणावर महिला नोकरी करीत आहेत. कायद्याने महिलांना ३० टक्के आरक्षण दिले आहे. कित्येक ठिकाणी महिलांची संख्या ५० टक्केपेक्षाही जास्त आहे त्यामुळे या कायद्याबद्दल व्यापक जाणीव जागृतीची आवश्यकता आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार यांनी राज्य घटनेच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करणारा हा कायदा आहे. या कायद्याबाबत सर्वांनी सकारात्मक काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी महिला आयोगाच्या सदस्या आशा लांडगे, प्रा. स्मिता अवचाल यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उपायुक्त पी. व्ही. शिर्के यांनी केले. आभार महिला व बाल विकास अधिकारी नितीन म्हस्के यांनी मानले. यावेळी आयोगाच्या सचिव डॉ. मंजुषा गोळवणे, सांगली जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय चव्हाण आदींसह कोल्हापूर, सोलापूर, सांगली व सातारा या चार जिल्ह्यांतील शासकीय कार्यालयांचे प्रमुख, समिती सदस्य यांची उपस्थिती होती.

2 0 AUG 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तक्रार निवारण समित्यांनी संतुलित निर्णय घ्यावा

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महिलांप्रती समाजात आदराची भावना निर्माण करणे, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे आणि अत्याचार करू पाहणाऱ्या प्रवृत्तींचा बिमोड करणे हे लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. म्हणून कायद्यांतर्गत तक्रार निवारण समितीला कायद्याने सिव्हिल कोर्टाचे अधिकार दिले आहेत. समितीचा निर्णय बंधनकारक केला असल्याने, या समित्यांनी योग्य व संतुलित निर्णय घ्यावा, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांनी केले.

'लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई आणि अन्याय निवारण अधिनियम–२०१३' या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य महिला आयोगाची औरंगाबाद, नागपूर, नाशिक, अमरावती या विभागांनंतर पाचवी विभागीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात राज्य महिला आयोगातर्फे आयोजित कार्यशाळेत प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी होते. दरम्यानच्या काळात झालेल्या जनसुनावणीमध्ये महिलांनी तक्रारी केल्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर. सोबत जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, चंद्रकांत दळवी. डॉ. कुणाल खेमणार, आशा लांडगे आदी.

डॉ. रहाटकर म्हणाल्या, कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक छळ प्रतिबंध संरक्षण (प्रतिबंध, मनाई, निवारण) अधिनियम २०१३ कायद्याची माहिती तक्रार निवारण समित्यांना असणे आवश्यक आहे. राज्य घटनेनुसार स्त्री–पुरूषांना समान अधिकार असला तरी प्रत्यक्षात समाजात विरोधाभास दिसतो. हा कायदा परिपूर्ण असून, महिलांना न्याय देण्यासाठी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होणे महत्वाचे आहे. हा कायदा पुरुषांच्या विरोधात नसून तो गैर वर्तणुकीच्या विरोधात आहे हे समजून घेतले पाहिजे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत १८ विद्यापीठातील ३५ हजार जणांना कायद्याचे प्रशिक्षण दिले असून भविष्यात २ लाख लोकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पुशचा पहिला टप्पा यशस्वी झाला असून दुसऱ्या टप्प्यात सर्व शासकीय कार्यालयातील समित्यांचे प्रशिक्षण सुरु आहे. खासगी व कार्पोरेट क्षेत्रांतही प्रशिक्षण देण्यात येणार असून कामाच्या ठिकाणी महिलांसाठी भयमुक्त व उत्तम वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त चंद्राकांत दळवी म्हणाले, महिला संरक्षण कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याची गरज आहे. लैंगिक छळाच्या घटनाच होऊ नयेत यासाठी प्रयत्न करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. महिला लोकशाही दिनाच्या कार्यक्रमांनंतर त्याच दिवशी तक्रार निवारण समित्यांची बैठक घेऊन, जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घ्यावा. प्रत्येक तालुक्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी हे नोडल ऑफीसर असतील असे त्यांनी जाहिर केले.

जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, कायद्याने महिलांना ३० टक्के आरक्षण असूनही कामाच्या ठिकाणी महिलांची संख्या ५० टक्केंपेक्षाही जास्त आहे. 'राईट टू एज्युकेशनचा' अधिकार मिळाला आता योग्य शिक्षणाची आवश्यकता आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार म्हणाले, महिला संरक्षण कायदा राज्य घटनेच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करणारा कायदा आहे.

उपायुक्त पी. व्ही. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. महिला व बाल विकास अधिकारी नितीन म्हस्के यांनी आभार मानले. यावेळी महिला आयोगाच्या सदस्या आशा लांडगे, सचिव डॉ. मंजुषा गोळवणे, सांगली जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय चव्हाण, महिला व बाल विकास उपायुक्त पी. व्ही. शिर्के, औरंगाबाद येथील प्रा. स्मिता अवचाल, प्रमुख, समिती सदस्य उपस्थित होते.

### शाहू नगरीत विद्यार्थीनींचा लैंगिक छळ निंदणीय

हॉकी सरावाच्या नावाखाली स्वत:च्या घरात नेऊन क्रीडा शिक्षकाने चार विद्यार्थीनींवर अत्याचार केल्याची तक्रार एका विद्यार्थीनीने केली आहे. याची दखल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने घेऊन नोटीस बजावली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी देशभरातील महिलांना सन्मान व न्याय दिला. त्याच करवीर नगरीत ही घटना घडाणे निंदणीय आहे, त्यामुळे गुन्हेगारावर कडक कारवाई करण्याचा आदेश महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने राजारामपुरी पोलीस स्टेशनला दिला आहे.

20 AUG 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समित्यांना कायद्याची माहिती आवश्यक

## - डॉ. विजया रहाटकर : विद्यापीठात महिला आयोगाची कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ अन्वये अंतर्गत तक्रार निवारण समितीला कायद्याने सिव्हिल कोर्टाचे अधिकार दिले आहेत. या अंतर्गत तक्रार निवारण समितीचा निर्णय बंधनकारक असल्यामुळे निर्णय संतुलित आणि योग्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी या कायद्याची माहिती अंतर्गत तक्रार निवारण समित्यांना होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्य महिला आयोगाचे अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात पार पडलेल्या पाचव्या विभागीय कार्यशाळेत डॉ. रहाटकर बोलत होत्या. अध्यक्षस्थानी पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी होते.



कोल्हापूर : राज्य महिला आयोगाच्या कार्यशाळेत बोलताना अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर. सोबत विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी आदी.

डॉ. रहाटकर म्हणाल्या, कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम हा कायदा करण्यात आला आहे. हा कायदा अत्यंत परिपूर्ण असून, समाजात महिलांवर अत्याचार होतात तेव्हा या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची ठरते. हा कायदा महिलांना संरक्षणही देतो आणि अन्याय झाल्यास न्यायही देतो. हा कायदा पुरुषांच्या विरोधात नसून तो गैरवर्तणुकीच्या विरोधात आहे, हे समजून घेतले पाहिजे. स्त्री आणि पुरुष समानतेच्या दृष्टीने हा कायदा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कायद्यांतर्गत असलेल्या तक्रार निवारण समितीला कायद्याने सिव्हिल कोर्टाचे अधिकार दिले आहेत. समितीचा निर्णय बंधनकारक केला आहे. कायद्याच्या जनजागृतीसाठी आयोगातर्फे 'पुश' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ४० हजार लोकांना या कायद्याचे प्रशिक्षण दिले आहे. यापुढेही २ लाख लोकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये १६ हजार लोकांना, साडेतीन हजार महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये या कायद्याबाबत जाणीव जागृती करण्यात आली आहे. सर्व शासकीय कार्यालयांतील समित्यांचे प्रशिक्षण सुरू आहे.

विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी म्हणाले, महिला संरक्षणाचे केवळ कायदे करून चालणार नाही, तर त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. लैंगिक छळाच्या घटनाच होऊ नयेत, असे वातावरण निर्माण करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. तक्रार आल्यास न्यायही मिळाला पाहिजे. यावेळी त्यांनी तक्रार निवारण समित्या स्थापन करून त्यांचे कामकाज प्रभावीपणे करा, महिला लोकशाही दिनाच्या कार्यक्रमानंतर त्याच दिवशी तक्रार निवारण समित्यांची बैठक घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घ्यावा, या कायद्याच्या जनजागृतीसाठी आयोगाने तयार केलेले पोस्टर्स दर्शनी भागात लावावेत, असे निर्देश दिले. त्यांनी या कायद्यांतर्गत तालुकानिहाय नोडल ऑफिसरची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे सांगून प्रत्येक तालुक्याचे बालविकास प्रकल्प अधिकारी हे नोडल ऑफिसर असतील, असे जाहीर केले. जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार म्हणाले, मोठ्या प्रमाणावर महिला नोकरी करत आहेत. कायद्याने महिलांना ३० टक्के आरक्षण दिले आहे. कित्येक कामाच्या ठिकाणी महिलांची संख्या ५० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे. त्यामुळे या कायद्याबद्दल व्यापक जाणीव जागृतीची आवश्यकता आहे. डॉ. कुणाल खेमणार म्हणाले, लिंगभेदावर आधारित कोणताही भेदभाव केला जाऊ नये. या कायद्याबाबत सर्वांनी सकारात्मक काम करणे आवश्यक आहे. महिला आयोगाच्या सदस्या आशा लांडगे, प्रा. स्मिता अवचाल, आयोगाच्या सदस्या सचिव डॉ. मंजूषा गोळवणे, सांगलीचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय चव्हाण आदी उपस्थित होते. महिला व बालविकास उपायुक्त पी. व्ही. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. महिला व बालविकास अधिकारी नितीन म्हस्के यांनी आभार मानले.